**Saturday, February 21, 2009**

**A helpline will soon be launched for complaint against smoking**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 2.

# धूम्रपान तक्रारीसाठी लवकरच हेल्पलाइन

## मुंबई महापालिका राबवणार उपक्रम

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) - धूम्रपानाचा त्रास सहन करणाऱ्या ७८ टक्के मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात आहे. यामध्ये गर्भवती महिला आणि लहान मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सिगरेटचे झुरके ओढून दुसऱ्याला मृत्यूच्या दाढेत ढकलणाऱ्या अशा लोकांची तक्रार करण्यासाठी पालिका लवकरच हेल्पलाइन सुरू करणार आहे.

- अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयविकार, खास करून लहान मुलांना दम्याचा त्रास
- अप्रत्यक्ष धूम्रपानाशी संबंध येत असल्याने महिला आणि लहान मुलांमध्ये अपमृत्यू आणि विकारांचे प्रमाण अधिक



धूम्रपान बंदी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे श्रेय प्रशासनाने स्वतः च्या खिशात घालण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. प्रामुख्याने उच्चभ्रू वसाहतीतल्या तीनशे लोकांच्या सर्वेक्षणातून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे निष्कर्ष काढून पालिका अधिकारी स्वतःची पाठ थोपटून घेताना दिसले.

---

गेल्या वर्षी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून केंद्र सरकारने धूम्रपान बंदी कायदा लागू केला. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांना कारवाईचा बडगा दाखविण्यास पालिकेने सुरुवात केली. मात्र धूम्रपान करणाऱ्यापेक्षा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले. अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयविकार, खास करून लहान मुलांमध्ये दम्याचे लक्षण दिसून येते. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या अंदाजानुसार दरवर्षी जगभरात कामाच्या ठिकाणी अप्रत्यक्ष धूम्रपानाशी संपर्कात येणारे सुमारे दोन लाख लोक मृत्युमुखी पडतात.

धूम्रपान करणाऱ्यांमुळे दररोज दूषित हवेत श्वास घेणाऱ्या अशा शेकडो लोकांना या त्रासाची तक्रार करण्यासाठी पालिका हेल्पलाइन सुरू करीत आहे. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्या लोकांची या हेल्पलाइनवरून तक्रार करणे आता शक्य होणार आहे. त्याचबरोबर सामाजिक संस्था यांच्या मदतीने राबविण्यात येणाऱ्या संयुक्त मोहिमेसाठी अॅक्शन कॉन्सिल अगेंस्ट टोबॅको या संस्थेने www.smokefreemumbai.org. ही वेबसाईटही सुरू केली आहे. टाटा मेमोरियल रुग्णालय, हेलिस सेक्सरिआ इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ, या संस्थेच्या सहकार्याने स्मोक फ्री कक्षही स्थापन करण्यात येणार आहे.